# बेडूक, बेडूकच राहील

मैक्स वी.

मराठी : अश्विनी बर्वे







“मी किती भाग्यवान आहे,” बेडूक आपले प्रतिबिंब पाण्यात निरखत म्हणाला. “मी सुंदर आहे आणि मी पाण्यात इतर सगळ्यांपेक्षा चांगला पोहू शकतो. मी हिरव्या रंगाचा आहे, आणि तोच माझा आवडता रंग आहे, जगात बेडूक होणं ही सगळ्यात चांगली गोष्ट आहे.



“मग माझं काय होईल?” बदक म्हणाले. “मी पांढऱ्या रंगाचा आहे. मी दिसायला सुंदर नाही का?”

“नाही तू सुंदर नाही,” बेडूक म्हणाले. “ तुझ्यात थोडाही हिरवा रंग नाही.”

“पण मी उडू शकतो,” बदक म्हणाले, “तू तर उडू शकत नाही.”



"ठीक आहे!“ बेडूक म्हणाले. “पण मी तुलाही उडतांना पाहिलं नाही.”

“मी थोडासा आळशी जरूर आहे,” बदक म्हणाले, “पण मी उडू शकतो, जरा बघ.” मग बदक जोरात पळालं आणि त्याने जोरात आवाज करत आपले पंख फडफडवले.



मग अचानक बदक जमिनीवरून वर उठले आणि मोठ्या सौंदर्यपूर्णरितीने आकाशात उडालं. त्याने हवेत काही चकरा मारल्या आणि मग बेडकाच्या समोर गवतावर उतरलं.

“आश्चर्यकारक!“ बेडूक, बदकाचे उडणे बघून ओरडले. “मलाही उडायचे आहे.”

"पण तू उडू शकत नाही, बदक म्हणाले. “कारण तुला पंख नाही.” मग बदक आनंदाने आपल्या घरी गेले.



आता बेडूक एकटेच राहिले आणि त्याने परत उडण्याचा अभ्यास सुरु केला. ते वेगात जमिनीवर धावले आणि त्याने जोरात आपले हात फडफडायला सुरुवात केली. पण पूर्ण प्रयत्न करूनही बेडूक जमीनवरून वर उडू शकले नाही.



यामुळे बेडूक खूप निराश झाले..

“मी कोणत्याच कामाचा नाही,” त्याने विचार केला. “मी उडू सुद्धा शकत नाही. जर मला पंख असते तर!”

मग बेडकाच्या मनात एक भारी विचार आला. जे काही बदक करू शकतो ते बेडूक पण करू शकतो.



एक आठवड्यापर्यंत बेडूक कागद आणि दोरी घेवून काम करत होते. शेवटी ते आपलं पहिलं उड्डाण करण्यासाठी तयार झालं.



ते नदीजवळ पहाडावर गेले. ते आधी लांबपर्यंत धावले जसे बदकाने करतांना त्याने पाहिले होते.

मग त्याने आपले दोन्ही हात फैलावून पहाडावरून हवेत उडी घेतली.



काही सेकंद ते चिमणी सारखं हवेत तरंगल.पण मग त्याचे पंख उखडून गेले आणि मग ते एका दगडासारखे जमीनवर येवून पडले आणि  बेडूक स्वतः धपकन नदीत पडले. पाण्यात पडल्याने कमीत कमी त्याला लागलं तरी नाही.



तेव्हा बेडकाने उंदराला पाण्यातून येतांना पाहिलं.

“तुला माहित पाहिजे की बेडूक हवेत उडू शकत नाही,” उंदीर म्हणाला.

“तू उडू शकतो का?” बेडकाने उंदराला विचारलं.

"बिलकुल नाही!” उंदीर म्हणाला. “मला पंख नाही, पण मी गोष्टी तयार करण्यात पुष्कळ कुशल आहे.”



बेडूक घरी जातांना याबद्दल विचार करू लागलं. जाता-जाता त्याने डुकराला विचारण्याचे ठरवले.

जेव्हा बेडूक तिथं पोहचलं तेव्हा डुक्कर आपल्या गरम भट्टीतून केक काढत होता.

“डुकरा तू उडू शकतो का?” बेडकाने विचारले.

"बिलकुल नाही!“ डुक्कर म्हणाले. “जर मी प्रयत्न केला तर मला खूप मार लागेल.



“मग तू काय करू शकतो?” बेडकाने विचारले.

“मी अनेक गोष्टी करू शकतो,” डुक्कर म्हणाले. “मी जगातला सगळ्यात चांगला केक तयार करू शकतो. मी दिसायला खूप सुंदर आहे. माझं शरीर गुलाबी आहे, आणि गुलाबी माझा आवडता रंग आहे.”

बेडकाला डुक्कराचे म्हणणे पटले.



“मला वाटतं की मी चांगला केक बनवू शकेल,” बेडकाने घरी जातांना विचार केला.

बेडकाला खाण्याची जी गोष्ट मिळाली ती त्याने एका पातेल्यात टाकली आणि ते सगळं तो ढवळू लागला. बिलकुल तसेच जसे त्याने डुकराला करतांना पाहिलं होतं.



मग त्याने केकचे मिश्रण एका पातेल्यात टाकलं आणि भाजण्यासाठी ते भट्टीत ठेवलं.

“बघाच,” बेडूक म्हणाले. “माझा केक खूप स्वादिष्ट होईल.”

पण काही वेळाने पातेल्यातून धूर निघू लागला आणि त्याचा वास खूप खराब होता. केक पूर्ण जळाला होता. “मी एक केक सुद्धा बनवू शकत नाही.” बेडकाने निराश होवून विचार केला.



मग बेडूक, सशाला भेटायला गेला.

“सशा, मी तुझ्याकडून एक पुस्तक उधार घेवू शकतो का?” बेडकाने विचारले.

“तुला वाचता येतं का?” सशाने आश्चर्याने विचारलं.

“नाही,“ बेडूक म्हणाले, “तू मला वाचायला शिकू शकतो का?”



बघ, ससा म्हणाला, “बघ हे “अ” अक्षर आहे आणि ते अक्षर “ब” आहे आणि ते अक्षर “स” आहे.

"ठीक आहे, माझ्या लक्षात आलं,” बेडूक म्हणाले. त्यानंतर बेडूक पुस्तक घेवून आपल्या घराकडे धावत गेलं.



मग तो आराम खुर्चीत बसला आणि त्याने पुस्तक उघडले. पण पुस्तकाच्या पानांवर लिहलेले शब्द असंबद्धित दिसू लागले. बेडूक एक शब्दसुद्धा वाचू शकला नाही. एका तासा मेहनत केल्यानंतरही त्याला काहीच कळले नाही. “मी हे पुस्तक वाचू शकणार नाही.” बेडूक म्हणाले. “हे माझ्यासाठी खूप कठीण काम आहे. मी एक खूप साधारण, आणि मूर्ख बेडूक आहे.”



खूप निराश आणि दुःखी होत बेडूक सशाला पुस्तक परत करायला गेला. “काय तुला पुस्तक आवडलं का?” सशाने विचारलं.

बेडकाने दुःखी होत आपलं डोकं हलवलं. “मला वाचायला येत नाही,” ते म्हणालं, “मला केक सुद्धा बनवता येत नाही, माझ्यात काहीच कौशल्य नाही, मी उडू शकत नाही, तू माझ्यापेक्षा कितीतरी हुशार आहे. मी काहीच करू शकत नाही. मी फक्त एक सामान्य हिरवं बेडूक आहे.” मग बेडूक रडू लागले.



“अरे बेडका, माझं ऐक,” ससा म्हणाला. “मी ही उडू शकत नाही, न मला केक आणि इतर गोष्टी बनवता येतात. मी तुझ्यासारखी उडी पण मारू शकत नाही आणि न मला पोहता येत..... कारण मी एक ससा आहे, आणि तू एक बेडूक आहे, आणि आम्ही सगळे तुझ्यावर खूप प्रेम करतो.”



मग बेडूक नदीच्या किनाऱ्यावर गेले आणि त्याने आपले प्रतिबिंब पाण्यात बघितले.

“तो मीच आहे,” त्याने विचार केला. “एक हिरवं बेडूक आहे ज्याने पट्टेरी चड्डी घातली आहे.”



अचानक बेडकाला चांगलं वाटलं आणि ते खूप खुश झालं. “सशाचे बरोबर सांगितले,” त्याने विचार केला. “मी भाग्यवान आहे की मी एक बेडूक आहे.” आणि मग ते आनंदाने उड्या मारू लागले. मग त्याने लांब उडी मारली जशी फक्त बेडूक मारू शकतात. त्याला असे वाटले की तो जसा हवेत उडत आहे.!

समाप्त

